


लोकसत्ता

ठाणे वृत्तान्त

रविवार, १३ जून २००४




# ओॲसिस : डोंबिवलीतील वैद्यकीय स्वयंपूर्णतेचे पुढचे पाऊल

गेल्या काही वर्षांत राज्याच्या सांस्कृतिक क्षितिजावर आपला दबदबा निर्माण करणाऱ्या डोंबिवली शहराची वाटचाल आता सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने दमदारपणे होत आहे. अगदी अलीकडेपर्यंत गुंतागुंतीच्या वैद्यकीय आपत्तीप्रसंगी डोंबिवलीकरांना मुंबईच्या दिशेला पळावे लागायचे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या दृष्टीने ती एक मनस्ताप देणारी उणीव होती. आता मात्र हळूहळू परिस्थिती बदलत आहे. अगदी मुंबई इतकीच दर्जेदार सेवा देऊ शकतील अशी रुग्णालये डोंबिवलीत निर्माण होऊ घातली असून, कॉमर्स सेंटर (टंडन रोड, डोंबिवली पूर्व) येथे सुरू झालेले डॉ. वंदना व शरद धाकतोडे दाम्पत्याचे अत्याधुनिक ओम रुग्णालय (ओॲसिस हॉस्पिटल) त्याच पंक्तीत बसणारे आहे.

न्यूझीलंडस्थित इंटरनॅशनल सर्टिफिकेशन लि. चे आयएसओ ९००१ दर्जा प्रमाणपत्र ओम हॉस्पिटललाही मिळाले आहे. सुमारे चार हजार चौरस फुटांच्या प्रशस्त जागेत अत्याधुनिक यंत्रणांनीयुक्त तीन ऑपरेशन थिएटर्स व ३५ खाटांची सोय रुग्णालयात आहे. शहरातील पहिल्या महिला सर्जन डॉ. वंदना धाकतोडे व डॉ. शरद धाकतोडे गेली ११ वर्षे पश्चिमेतील साईश्रद्धा हॉस्पिटलच्या माध्यमातून डोंबिवलीकरांना परिचित आहेत. आयएसओ ९००१ च्या दर्जाला साजेशी अत्याधुनिक यंत्रणा त्यांनी ओम हॉस्पिटलसाठी उभारली आहे. त्याचाच भाग म्हणून त्यातील ऑपरेशन थिएटर हे पूर्णपणे स्टेनलेस स्टीलपासून बनविण्यात आले आहे. त्याचबरोबर ऑपरेशन थिएटरसाठी लॅमिनर एअरफ्लो सिस्टीमचा वापर



वैद्यकीय

वृत्तान्त प्रतिनिधी

करण्यात आल्याने ते पूर्णतः निर्जंतुक (बॅक्टेरिया फ्री) राहील. त्यामुळे या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रियेसारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करणे शक्य होणार आहे. मुंबईतल्या ब्रीच कॅण्डी या बड्या खासगी रुग्णालयात अशा प्रकारचे स्टेनलेस स्टीलचे ऑपरेशन थिएटर आहे. ठाणे जिल्ह्यात ते प्रथमच होत असल्याचे डॉ. शरद धाकतोडे यांचे म्हणणे आहे.

अस्थिभंग, युरोलॉजी, प्लास्टिक सर्जरी, मेंदू शस्त्रक्रिया, कर्करोग, मणक्याची शस्त्रक्रिया, लहान मुलांचे आजार, नवजात अर्भकांवरील शस्त्रक्रियांसारख्या सुपर स्पेशालिटी ट्रिटमेंट ओम हॉस्पिटलमध्ये डोंबिवलीकरांना मुंबई इतक्याच खात्रीने उपलब्ध होणार आहेत. मुंबईच्या तुलनेत कमी खर्चात या सेवा उपलब्ध करून दिल्या जातील, त्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचा मनस्ताप व खर्च कमी होईल. नवी मुंबई, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर व ठाणे परिसरातील रुग्णांना त्यामुळे लाभ होणार आहे.

सी-आर्म इमेज इन्टेंसिफायर एक्स-रे टीव्ही सिस्टीम, हैड्रॉलिक ओ.टी. टेबल, सर्व्हो ९००सी व्हेंटिलेटर, सेंट्रल ऑक्सिजन, डेफिब्रिलेटर (हृदयाची धडधड थांबल्यास इलेक्ट्रिक शॉकने पुन्हा चालू करण्यासाठी), पल्स ऑक्सिमीटर (रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण पाहण्यासाठी), इन्फ्युजन पम्प्स (रुग्णाला ठराविक वेळाने स्वयंचलितपणे इंजेक्शन देण्यासाठी) अशा यंत्रणा या रुग्णालयात उपलब्ध केल्या आहेत. आता गंभीर व गुंतागुंतीच्या प्रसंगी रुग्णांना डोंबिवलीतून मुंबईकडे हलविण्याची आवश्यकता भासणार नाही, असे डॉ. धाकतोडे यांनी सांगितले. ■